


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८४ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शुक्रवार ३१/०७/२०२६ । पाने - ६




# शाळांच्या ५० मीटर - परिसरात 'जंक फूड' बंदी

## अन्न व औषध प्रशासन नियमाची कठोर अंमलबजावणी करणार



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठा निर्णय घेतला आहे. शाळांच्या ५० मीटरच्या परिसरात प्रक्रिया केलेले, डबाबंद खाद्यपदार्थ, जास्त चरबी, साखर व मीठ असणाऱ्या पदार्थांच्या विक्री, मोफत वाटपासह जाहिरातीवर असलेल्या बंदीची कठोर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. याचा अनुपालन आदेश जारी केला आहे, अशी माहिती एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बुधवारी पत्र परिषदेत दिली. राज्यातील दोन कोटी विद्यार्थ्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी हा निर्णय लागू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना फळे, भाज्या, कडधान्ये, दूध व पौष्टिक पदार्थ उपलब्ध करण्यावर भर देण्यात येणार आहे. शाळांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन याची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल.

शाळा व्यवस्थापनाला अन्न सुरक्षिततेसाठी प्राथमिक जबाबदार ठरवण्यात येईल. ५० मीटर परिसरात नियमबाह्य विक्री आढळल्यास अन्नसुरक्षा अधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थेला कळवावे लागेल. राज्य मंडळ व इतर मंडळांनी स्कूल फूड रेग्युलेशनचे पालन संलग्नता व नूतनीकरणासाठी अनिवार्य करावे आणि गंभीर उल्लंघनांवर कारवाई करावी, असे मुंढे यांनी स्पष्ट केले. 'इट राइट स्कूल, इट राइट कॅम्पस' संकल्पनेला महत्त्व देण्यात आले असून, प्रत्येक शाळेने स्कूल न्यूट्रिशन पॉलिसी, वर्षातून किमान चार जनजागृती सत्रे व आदर्श आरोग्यदायी कॅन्टीन विकसित करावी, असे ते म्हणाल

प्रत्येक शाळेला स्वतंत्र अन्न सुरक्षा मंडळ स्थापन करावे लागणार आहे. कॅन्टीनमधील तसेच शाळेत उपलब्ध होणाऱ्या अन्नाची तपासणी करण्यासाठी एका पर्यवेक्षकाची नियुक्ती करणे सक्तीचे. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर ५० मीटर परिसरात जंक फूड विक्री आणि जाहिरातींना बंदी असल्याचा सूचना फलक लावणे बंधनकारक. शाळेचे कॅन्टीन, मेस किंवा मध्यान्ह भोजन पुरवणाऱ्या कंत्राटदाराकडे भारतीय अन्न सुरक्षा, मानक प्राधिकरणाचा वैध परवाना असणे आवश्यक.

## संगमनेरचा सुपुत्र आणि भारताचा लाडका क्रिकेटपटू



# अजिंक्य रहाणेंची क्रिकेटमधून निवृत्ती

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

भारतीय फलंदाज अजिंक्य रहाणे यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. भारतासाठी ८५ कसोटी, ९० एकदिवसीय आणि २० टी-२० सामने खेळलेल्या रहाणे यांनी त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ जारी करून या निर्णयाची माहिती दिली. रहाणे म्हणाले की, आता त्यांच्यासाठी पुढे जाण्याची हीच योग्य वेळ आहे. रहाणे यांनी व्हिडिओमध्ये म्हटले, आयुष्याचे सत्य हेच आहे की प्रत्येक गोष्टीची सुरुवात होते आणि शेवटही असतो. जेव्हा वेळ येते, तेव्हा आपल्याला फक्त तिचा आदर करायचा असतो आणि पुढे जायचे असते. मी माझ्या फलंदाजीमध्ये नेहमीच टाइमिंगवर विश्वास ठेवला आहे आणि त्याचे महत्त्व समजून घेतले आहे. आज मला वाटते की आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती घेण्याची हीच योग्य वेळ आहे.

संन्यास घेतल्यानंतर आपल्या भविष्यातील योजनांवर बोलताना रहाणे यांनी स्पष्ट केले की, खेळासोबतचा त्यांचा प्रवास संपलेला नाही. ते म्हणाले, एक भारतीय क्रिकेटपटू म्हणून माझे पर्व जरी संपत असले तरी, या खेळासोबतचा माझा प्रवास सुरूच राहील. मी पुढील पिढीला मदत करण्यासाठी, या खेळातून शिकलेली मूल्ये सामायिक करण्यासाठी आणि ज्या खेळाने मला सर्व काही दिले, त्या खेळाला परत देण्यासाठी उत्सुक आहे. रहाणे यांच्या कारकिर्दीतील सर्वात सुवर्ण अध्याय २०२०-२१ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर लिहिला गेला. ॲडलेड कसोटीत भारताचा ३६ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर आणि विराट कोहली परतल्यानंतर रहाणे यांनी कर्णधारपदाची धुरा सांभाळली.

(पान २ वर)




# कायदा तोच तरतुदी मात्र अधिक कडक

## दहा कोटी दंडापासून दहा वर्षे शिक्षा

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशातील परीक्षा पद्धतीला लागलेली पेपर फुटीची कीड मुळापासून उपटून टाकण्यासाठी केंद्र सरकारने संसदेत अत्यंत मोठे पाऊल उचलले आहे. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या पेपर लीक सिंडिकेट आणि संस्थांना थेट दणका देणारे 'सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६' लोकसभेत बुधवारी मंजूर करण्यात आले. विरोधी पक्षांच्या जोरदार घोषणाबाजी, गदारोळ आणि सभात्यागाच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक आवाजी मतदानाने संमत झाले.

नीट यूजी परीक्षेच्या पेपर फुटीनंतर देशभरात उफाळून आलेल्या तीव्र विद्यार्थी आंदोलनांनंतर सरकारने हा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी हे विधेयक पटलावर ठेवले. २०२४च्या मूळ कायद्यातील त्रुटी दूर करून गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी यात अत्यंत कठोर शिक्षा, जलद तपास आणि वेगवान न्यायनिवाड्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक परीक्षांची पवित्रता जपणे, हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. लोकसभेची मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक आता अंतिम मंजुरीसाठी राज्यसभेत पाठवले जाईल. तिथे मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने याचे कायद्यात रुपांतर होईल.

### आधीचा कायदा (2024)

आधीचा कायदा (२०२४)
वैयक्तिक गुन्हेगारांसाठी : ३ ते ५ वर्षे तुरुंगवास
वैयक्तिक गुन्हेगारांसाठी दंड : कमाल १0 लाख रुपये
संघटित गुन्हेगारी : ५ ते १0 वर्षे तुरुंगवास, १ कोटी दंड
परीक्षा एजन्सी/सेवा पुरवठादार दंड : कमाल १ कोटी रुपये
परीक्षा एजन्सींवर बंदी : ४ वर्षांसाठी बंदी
खटल्यासाठी न्यायालये : विशेष न्यायालयांची तरतूद नव्हती;
तपास आणि सुनावणी : कोणतीही निश्चित कालमर्यादा नव्हती
विशेष टास्क फोर्स : कायद्यात थेट तरतूद नव्हती

### नवे सुधारणा विधेयक (2026)

वैयक्तिक गुन्हेगारांसाठी : ५ ते १0 वर्षे तुरुंगवास
वैयक्तिक गुन्हेगारांसाठी दंड : कमाल ५0 लाख रुपये
संघटित गुन्हेगारी : ७ ते १0 वर्षे तुरुंगवास,१0 कोटी रुपये दंड
परीक्षा एजन्सी/सेवा पुरवठादार दंड : कमाल ५ कोटी रुपये
परीक्षा एजन्सींवर बंदी : ८ वर्षांसाठी काळ्या यादीत
खटल्यासाठी न्यायालये : राज्यात विशेष फास्ट-ट्रॅक न्यायालय
तपास आणि सुनावणी : २ महिन्यांत तपास, आरोपपत्रानंतर ३ महिन्यांत खटला पूर्ण करणे
विशेष टास्क फोर्स : संघटित परीक्षा गुन्ह्यांचा तपास केंद्र सरकारच्या विशेष टास्क फोर्सकडे

## संसद पावसाळी अधिवेशन

# विद्यार्थी आंदोलनासह राम मंदिर प्रश्नावर विरोधक आक्रमक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

संसद कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी खासदारांनी गुरुवारी सकाळी १०:३० वाजता मकर द्वार येथे निदर्शने केली. त्यांनी २० जुलै रोजी जंतर-मंतरवर विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाई आणि अयोध्येतील राम मंदिरात निधी चोरीच्या आरोपावरून केंद्र सरकारविरोधात निषेध नोंदवला. प्रियांका गांधी या निदर्शनांमध्ये सहभागी झाल्या.


राज्यसभेत दुपारी २ वाजल्यापासून पेपरफुटीशी संबंधित सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक-२०२६ सादर केले जाईल. यावर सुमारे सात तास चर्चा होण्याची शक्यता आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे चर्चेत भाग घेतील. लोकसभेत सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक, २०२६ वर चर्चा होणार आहे. पेपरफुटीशी संबंधित विधेयक बुधवारी सुमारे सात तासांच्या चर्चेनंतर लोकसभेत मंजूर झाले होते. सरकारने याला पेपरफुटीविरोधात एक मोठे पाऊल म्हटले, तर विरोधकांचे म्हणणे होते की, केवळ शिक्षा वाढवल्याने समस्या संपणार नाही, तर परीक्षा प्रणालीत सुधारणा करणेही आवश्यक आहे.









# अकोले भाजपमध्ये उभी फूट

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष निवडीपूर्वी भाजप अंतर्गत राजकारण चांगलेच तापले आहे. ३१ जुलै रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्येच उभी फूट पडल्याने सत्तासंघर्षाने नवे वळण घेतले. स्वपक्षातीलच बंडखोर नगरसेवकांनी माजी आमदार वैभव पिचड यांच्यासमोर नवे आव्हान उभे केले. तर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने तमन्ना शेख या गटनेता झाल्यानंतरही पदच्युत नगराध्यक्ष व तत्कालीन गटनेता बाळासाहेब वडजे यांनी बुधवारी सर्व भाजप नगरसेवकांना पिचड पुरस्कृत उमेद्वार वैष्णवी धुमाळ यांनाच मतदान करण्यास लेखी व्हीप बजावला.

या व्हीपनुसार ३१ जुलै सकाळी ११ वाजता होणाऱ्या निवडीसाठी सर्वांनी सकाळी १०.४५ पर्यंत १०० टक्के उपस्थित राहावे व मतदान केवळ वैष्णवी धुमाळ यांनाच करावे, असे स्पष्ट आदेश दिले. गैरहजर राहिल्यास, तटस्थ राहिल्यास किंवा व्हीपविरोधात मतदान केल्यास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम व पक्षांतरबंदी कायद्यानुसार थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे अपात्रतेची कारवाई करण्यात येईल, असा कडक इशाराही दिला आहे. सध्या गटनेतेपदी तमन्ना शेख आहेत की बाळासाहेब वडजे, यावरून नगरसेवकांत गटनेतेपदावरूनही संभ्रम निर्माण झाला आहे.

दरम्यान, १७ जुलै रोजी झालेल्या अविश्वास ठरावाच्या वेळी सभागृहात गैरहजर राहिलेल्या भाजपच्या चारही नगरसेवकांविरोधात गटनेत्या तमन्ना शेख यांनी पक्षशिस्त भंगाची केलेल्या कारवाईत जिल्हाधिकाऱ्यांसमोर २९ जुलैला सुनावणीसाठी हजर राहण्याची नोटीस दिली. मात्र आज चौघांनीही वकिलांमार्फत मुदतवाढ मागितली आहे.

नगराध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वैभव पिचड यांनी ३० जुलैस भाजप कार्यालयात तालुक्यातून आपल्याच समर्थक पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक बोलावली. बैठकीत ३१ जुलैला मतदानासाठी येणाऱ्या बंडखोर नगरसेवकांचे अकोल्यात व सभागृहात कसे स्वागत करायचे, यावरील रणनीती ठरवली जाणार असल्याचे समजते.

# संगीता डोंगरे जिल्हा बँकेच्या नव्या प्रशासक

युवावार्ता (प्रतिनिधी)-

अहिल्यानग - नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकपदी अतिरिक्त निबंधक (सहकारी संस्था) संगीता डोंगरे यांची पदोन्नती नियुक्ती करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचे वेध लागलेले असतानाच प्रशासक पदात गेल्या तीन महिन्यात झालेला हा तिसरा बदल आहे. दरम्यान श्रीमती डोंगरे आज


बुधवारी प्रशासक पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीची धुरा सध्यातरी नाशिक विभागाची विभागीय सहनिबंधक यांच्याकडेच राहणार असल्याचे सांगण्यात आले.



संचालक मंडळाची मुदत गेल्या फेब्रुवारीमध्ये संपली. त्यानंतर मे मध्ये बँकेवर जिल्हा विशेष लेखापरीक्षक गौतम निकाळजे यांची एक सदस्यीय प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यामध्ये राज्य सरकारने गेल्या महिन्यात बदल करून विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले. त्यामध्ये जिल्हा विशेष लेखापरीक्षक निकाळजे व जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. आता पुन्हा प्रशासक मंडळा ऐवजी एक सदस्यीय प्रशासक म्हणून अतिरिक्त निबंधक संगीता डोंगरे यांची राज्य सरकारने नियुक्ती केली आहे.

डोंगरे यापूर्वी सन २०१६ ते २०१८ या दरम्यान प्रादेशिक साखर सहसंचालक म्हणून नगरमध्ये नियुक्त होत्या. त्यानंतर त्यांनी मुंबई (सिडको), पुणे बाजार समितीच्या सचिव म्हणून काम पाहिले. त्या सध्या कोल्हापूर येथे प्रादेशिक साखर संचालनालयात नियुक्त होत्या. तेथून त्यांची नगरला जिल्हा बँकेच्या प्रशासक म्हणून पदोन्नतीने नियुक्ती झाली आहे. सध्या जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचे वेध लागलेले आहेत. त्यासाठी प्रारूप मतदार यादी तयार करण्यासाठी सभासद संस्थांकडून ठराव मागवलेले आहेत. या ठरावांचे संकलन जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे झालेले आहे. बँकेच्या सभासद संस्थांनी निकष व अटी, नियमानुसार ठराव केलेले आहेत की नाही याची पडताळणी करण्यासाठी हे ठराव नाशिक विभागीय निबंधक कार्यालयाकडे पाठवण्यात आलेले आहेत. त्यानंतर प्रारूप मतदार यादी जाहीर होऊन त्यावर हरकती व दावे मागवले जातील त्यानंतर अंतिम यादी प्रसिद्ध होणार आहे.

# हृदयनाथ मंगेशकर यांना व्ही. शांताराम पुरस्कार सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव जाहीर



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्य सरकारने व्ही. शांताराम आणि राज कपूर पुरस्कारांची घोषणा केली आहे. चित्रपट, संगीत आणि अभिनय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिग्गजांचा यंदा या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने आज (२९ जुलै) बुधवारी याबाबत अधिकृत माहिती दिली.

यंदाचा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना जाहीर झाला आहे. मराठी आणि हिंदी चित्रपटसंगीतासह भक्तीगीत, भावगीत आणि शास्त्रीय संगीतावर आधारित त्यांच्या रचनांना मोठी लोकप्रियता मिळाली आहे.

अभिनेते प्रसाद ओक यांना चित्रपट क्षेत्रातील विशेष योगदानासाठी व्ही. शांताराम पुरस्कार जाहीर झाला आहे. मराठी चित्रपट, नाटक आणि दूरदर्शन क्षेत्रातील त्यांच्या कामाची दखल घेत हा सन्मान देण्यात येणार आहे. धर्मवीर आणि धर्मवीर २ या चित्रपटांच्या दिग्दर्शनामुळे त्यांची विशेष चर्चा झाली होती.

राज कपूर जीवनगौरव पुरस्कार हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना जाहीर झाला आहे. तसेच अभिनेत्री राणी मुखर्जी यांना राज कपूर विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. चित्रपटसृष्टीतील विविध क्षेत्रांत दीर्घकाळ मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा या पुरस्कारांद्वारे गौरव केला जातो.

# गुरुपौर्णिमेनिमित्त प. पू. श्री श्री रविशंकर व महर्षी वेदव्यास यांचे पूजन




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सुमेरू एज्युकेशन संचालित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेर येथे गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, गुरुंबद्दल आदर, कृतज्ञता आणि मूल्याधिष्ठित जीवनाची प्रेरणा देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, व संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी आराध्या थोरात आणि शारदा कळसकर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी इयत्ता आठवीची विद्यार्थिनी शिवानी नय्यर हिने प्रास्ताविकातून गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करत उपस्थितांचे स्वागत केले.

भारतीय संस्कृतीत गुरूला ज्ञानाचा दीप मानले जाते. गुरुपौर्णिमा हा गुरुंच्या ऋणाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असून, महर्षी वेदव्यास यांच्या जयंतीनिमित्त हा उत्सव साजरा केला जातो. गुरुंच्या मार्गदर्शनामुळेच व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, हा संदेश यावेळी देण्यात आला.

विद्यालयच्या समन्वयक शिक्षिका अशालता दातीर यांच्या हस्ते परमपूज्य श्री श्री रविशंकर तसेच महर्षी वेदव्यास यांच्या प्रतिमांचे पूजन करून गुरुपौर्णिमा उत्सवाची भक्तिमय वातावरणात सुरुवात करण्यात आली. पूजनानंतर उपस्थितांनी गुरुवंदना करत गुरुंच्या ज्ञान, संस्कार आणि मूल्याधिष्ठित जीवनदृष्टीप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

त्यानंतर इयत्ता सातवी, आठवी आणि नववीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या सत्संगाने उपस्थितांची मने जिंकली. भजन, प्रार्थना आणि आध्यात्मिक संदेशांद्वारे गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थिनींच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

यावेळी संस्थापिका स्वाती शाह, सचिव समीर शाह, मुख्याध्यापिका आरती सप्रा व उपमुख्याध्यापिका ज्योतिर्मया चव्हाण यांची उपस्थिती लाभली.

# संगमनेरला शुक्रवारी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'

## आ. खताळांच्या हस्ते प्रमाणपत्राचे होणार वाटप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व उपमुख्य मंत्री अजित पवार यांच्या जयंतीच्या निमित्त शुक्रवार,३१ जुलै २०२६ रोजी सकाळी १०वाजता 'अमोल खताळ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मालपाणी लॉन्स या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजास्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.



या शिबिरात उत्पन्न,जात, रहिवासी, ज्येष्ठ नागरिक, नॉन-क्रीमी लेयर, जन्म-मृत्यू दाखले, विविध सामाजिक न्याय, महसूल, ग्रामविकास, कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, कामगार, दिव्यांग कल्याण, शैक्षणिक शिष्यवृत्ती, संजय गांधी निराधार योजना,श्रावणबाळ योजना, बांधकाम कामगार नोंदणी, कृषी योजनांची माहिती, शासनाच्या विविध कल्याण कारी योजना तसेच नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामांशी संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय विविध विभागांच्या योजनांबाबत मार्गदर्शन व आवश्यक कागदपत्रांची माहितीही नागरिकांना दिली जाणार आहे.

शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचावा आणि त्यांची शासकीय कामे सुलभ व्हावीत, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सर्व लाभार्थी, शेतकरी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध योजनांसाठी पात्र लाभार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवसेना महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहीर प्रकटन

मी, **सचिन धर्माजी औटी,** याद्वारे जाहीर करतो की माझ्या पासपोर्टमध्ये माझ्या पत्नीचे नाव चुकून

**"मनिषा सचिन औटी"**

असे नमूद झाले आहे.

माझ्या पत्नीचे माहेरचे नाव **मणिशा राधु कवाद** असून विवाहानंतर तिचे योग्य व अधिकृत नाव

**"स्मिता सचिन औटी"**

असे आहे.

तरी माझ्या पासपोर्टमध्ये नमूद असलेले पत्नीचे नाव **"मनिषा सचिन औटी"** ऐवजी **"स्मिता सचिन औटी"** असेच योग्य व अधिकृत नाव म्हणून ग्राह्य धरण्यात यावे.

मणिशा राधु कवाद, मणिशा सचिन औटी व **स्मिता सचिन औटी** ही तिन्ही नावे एकाच व्यक्तीची असून याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि. 29.07.2026 – सचिन धर्माजी औटी (जाहीर करणारा)


पान १ वरून

# अजिंक्य रहाणेंची क्रिकेटमधून...

मेलबर्नमध्ये शतक ठोकून त्यांनी भारताला विजय मिळवून दिला आणि मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. रहाणे यांच्या नेतृत्वाखाली भारताने गाबा येथे ऐतिहासिक विजय नोंदवून ऑस्ट्रेलियाला २-१ ने मालिका हरवले आणि त्यांचा ३२ वर्षांचा अजिंक्य विक्रम मोडला.रहाणेने भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०११ मध्ये पदार्पण केले होते. त्याने पहिला एकदिवसीय सामना ३ सप्टेंबर २०११ रोजी इंग्लंडविरुद्ध चेस्टर-ले-स्ट्रीट येथे खेळला, तर टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये ३१ ऑगस्ट २०११ रोजी मँचेस्टर येथे इंग्लंडविरुद्ध पदार्पण केले.

रहाणेने कसोटी क्रिकेटमध्ये २२ मार्च २०१३ रोजी दिल्लीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला सामना खेळला. त्याची शेवटची कसोटी २०-२४ जुलै २०२३ दरम्यान पोर्ट ऑफ स्पेन येथे वेस्ट इंडिजविरुद्ध होती. वनडेमध्ये त्यांनी आपला शेवटचा सामना १६ फेब्रुवारी २०१८ रोजी सेंच्युरियन येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला, तर टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये शेवटचे २८ ऑगस्ट २०१६ रोजी लॉडरहिल येथे वेस्ट इंडिजविरुद्ध भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले.रहाणेने क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचे कर्णधारपद भूषवले. कसोटी क्रिकेटमध्ये रहाणेने ६ सामन्यांमध्ये भारताचे कर्णधारपद सांभाळले. यापैकी संघाने ४ सामने जिंकले, तर २ कसोटी सामने अनिर्णित राहिले.

वनडेमध्ये त्यांनी ३ सामन्यांमध्ये संघाची धुरा सांभाळली आणि भारताने तिन्ही सामने जिंकले.

# शिक्षणाचा बाजार आणि स्वप्नांची किंमत

## डिग्रीपेक्षा कौशल्य महत्त्वाचे, पण व्यवस्था तयार आहे का ?




**पूर्वी शालेय सुट्ट्या म्हणजे आनंद, खेळ आणि विश्रांतीचा काळ मानला जायचा. मात्र, आजच्या काळात सुट्ट्या म्हणजे निकालांचा हंगाम बनला आहे. त्यासोबतच सुरू होतो तो अपेक्षांचे ओझे, मानसिक तणाव आणि भविष्यातील अनिश्चिततेचा प्रवास. लाखो विद्यार्थी मेडिकल, इंजिनीअरिंग आणि इतर स्पर्धात्मक प्रवेश परीक्षांसाठी दिवस-रात्र मेहनत घेतात, तर पालक आपल्या मुलांच्या स्वप्नांसाठी आयुष्यभराची बचत कोचिंग क्लासेसवर खर्च करतात. तरीही शेवटी एक प्रश्न कायम राहतो-या सर्व मेहनतीचा आणि खर्चाचा खरोखर योग्य मोबदला मिळतो का? की आजची शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग दाखवण्याऐवजी एका महागड्या लॉटरीत सहभागी होण्यास भाग पाडत आहे?**

आज ९५ टक्के किंवा ९९ टक्के गुण मिळवणेही सामान्य झाले आहे. गुण ही गुणवत्ता मोजण्याची पद्धत राहिलेली नसून ती एक शर्यत बनली आहे. हजारो विद्यार्थी अत्यंत उच्च गुण मिळवतात, मात्र सरकारी शिक्षणसंस्थांमधील मर्यादित जागांमुळे प्रत्येकाला इच्छित शाखा किंवा संस्थेत प्रवेश मिळणे शक्य होत नाही. परिणामी, गुणांची संख्या वाढत असताना त्यांची किंमत कमी होत चालली आहे. या परिस्थितीला मार्कांची महागाई असे म्हणता येईल.

या स्पर्धेत कोचिंग उद्योगाने मोठे स्वरूप धारण केले आहे. दोन-तीन वर्षांच्या तयारीसाठी लाखो रुपयांचा खर्च करावा लागतो. अनेक पालक दागिने गहाण ठेवतात, जमीन विकतात किंवा कर्ज घेतात. आपल्या मुलांच्या भविष्यासाठी ते सर्वस्व पणाला लावतात. तरीही यशाची कोणतीही हमी नसते. कोचिंग संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना विचार करायला शिकवण्यापेक्षा प्रश्न सोडवण्याच्या पद्धती आणि ट्रिक्स शिकवल्या जातात. त्यामुळे विद्यार्थी संकल्पना समजून घेण्यापेक्षा परीक्षेतील गुण मिळवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करतात. सर्जनशीलता, स्वतंत्र विचारसरणी आणि नवीन कल्पनांना प्रोत्साहन मिळण्याऐवजी विद्यार्थ्यांची मानसिकता यांत्रिक बनत जाते. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात मोठे नुकसान होते ते मुलांच्या बालपणाचे. लहान वयापासूनच त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे टाकले जाते. खेळण्यासाठी वेळ राहत नाही, मित्रमैत्रिणींसोबतचे क्षण कमी होतात आणि स्वतंत्रपणे विचार करण्याची संधीही मिळत नाही. मुलांना केवळ स्पर्धेच्या शर्यतीत धावण्यासाठी तयार केले जाते. परिणामी, भविष्यातील संशोधक, शास्त्रज्ञ किंवा नवकल्पना निर्माण करणारे नागरिक तयार होण्याऐवजी केवळ परीक्षांसाठी तयार झालेले विद्यार्थी निर्माण होत आहेत.

या व्यवस्थेचा सर्वात गंभीर परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होत आहे. दरवर्षी अनेक विद्यार्थी अपयश, अपेक्षांचा दबाव आणि सततच्या तुलनेमुळे नैराश्याचा सामना करतात. काही विद्यार्थी तर टोकाचे निर्णय घेतात. ही केवळ वैयक्तिक समस्या नसून गंभीर सामाजिक समस्या बनली आहे.

खरी गोष्ट अशी आहे की समस्या विद्यार्थ्यांमध्ये नाही, तर आपण निर्माण केलेल्या व्यवस्थेमध्ये आहे. आजची शिक्षण व्यवस्था गुणांना महत्त्व देते, परंतु मानवी मूल्ये, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासाला तितकेसे स्थान देत नाही.

या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. प्रत्येक मूल वेगळे असते. प्रत्येकाची आवड, क्षमता आणि स्वप्ने वेगळी असतात. पालकांनी आपल्या मुलांच्या गुणांपेक्षा त्यांच्या आवडी आणि कौशल्यांना प्राधान्य द्यायला हवे. कारण गुण काही काळापुरते महत्त्वाचे असतात, पण समज, अनुभव आणि ज्ञान आयुष्यभर उपयोगी पडते.

आजच्या काळात डिग्रीपेक्षा कौशल्यांना अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. संवाद कौशल्य, समस्या सोडवण्याची क्षमता, वेळेचे व्यवस्थापन, सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्ये आणि नेतृत्वगुण यांसारख्या जीवनावश्यक कौशल्यांवर भर देणे आवश्यक आहे. स्वयंअध्ययनाची सवय आणि आत्मविश्वास विकसित करणे ही शिक्षणाची खरी उद्दिष्टे असायला हवीत. पालकांनीही कोचिंगवर वारेमाप खर्च करण्याऐवजी समजूतदारपणे गुंतवणूक करण्याची गरज आहे. मुलांना केवळ गुणांच्या शर्यतीत ढकलण्यापेक्षा त्यांना समजून घेणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांच्या स्वप्नांना योग्य दिशा देणे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षण ही लॉटरी नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे. जोपर्यंत आपण गुणांपेक्षा ज्ञानाला आणि स्पर्धेपेक्षा कौशल्यांना महत्त्व देणार नाही, तोपर्यंत ही शर्यत थांबणार नाही. आता वेळ आली आहे ती शिक्षण व्यवस्थेचा पुनर्विचार करण्याची आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अधिक संवेदनशील व सर्वसमावेशक व्यवस्था उभी करण्याची.

# साखरसाठ्यावर केंद्राचे निर्बंध

## ३० दिवसांपेक्षा अधिकचा साठा ठेवण्यास मनाई

मुंबई (वृत्तसंस्था)

अपुऱ्या पावसाच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर देशात साखरेचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि सणासुदीच्या काळात संभाव्य तुटवडा टाळण्यासाठी केंद्र सरकारने साखर व्यापाऱ्यांवर नवीन निर्बंध लागू केले आहेत. १ ऑगस्टपासून देशातील कोणत्याही साखर व्यापाऱ्याला साखरेचा साठा ३० दिवसांपेक्षा अधिक काळ ठेवता येणार नाही. तसेच, कोणत्याही ठिकाणी एकावेळी ४,००० क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवण्यासही बंदी घालण्यात आली आहे. हे निर्बंध ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत लागू राहतील.अन्न व ग्राहक व्यवहार मंत्रालयाने मंगळवारी राजपत्रात यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध केली. अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ आणि साखर (नियंत्रण) आदेश, २०२५ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. साखर व्यापाऱ्यांनी आपल्या साठ्याची माहिती सरकारच्या ऑनलाइन पोर्टलवर जाहीर करून ती नियमित अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. साठा किती दिवस ठेवला आहे, याची गणना करताना साखर प्राप्त झाल्याचा दिवसही ग्राह्य धरण्यात येणार आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) अंतर्गत रास्त भाव दुकानांमार्फत वितरणासाठी केंद्र किंवा राज्य सरकारच्या वतीने साठविण्यात आलेल्या साखरेला या निर्बंधांतून सूट देण्यात आली आहे. तसेच, राज्य सरकारने नियुक्त केलेल्या व्यापाऱ्यांनाही ही सूट लागू असेल. इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (आयएसएमए) २०२५-२६ हंगामात इथेनॉल निर्मितीसाठी वळविलेली साखर वजा जाता देशात २९.३ दशलक्ष टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला आहे. मागील हंगामात हे उत्पादन २६.१२ दशलक्ष टन होते.




शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

छोट्या जाहिराताठी संपर्क करा
8830508244
8380956604
7620388230




# सर्वांना सुख, समृद्धी आणि आरोग्यसंपन्न जीवन लाभो, आमदार अमोल खताळ यांची साईचरणी प्रार्थना



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सर्वांना सुख, शांती, समृद्धी आणि आरोग्यसंपन्न जीवन लाभो. प्रत्येक कुटुंब आनंदी राहो, शेतकऱ्यांच्या शेतात भरघोस पीक यावे तसेच समाजात सौहार्द, बंधुभाव आणि शांततेचे वातावरण कायम राहावे, अशी प्रार्थना आमदार अमोल खताळ यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त साईबाबांच्या चरणी केली. गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त संगमनेर शहरातील साईबाबा मंदिर तसेच श्री स्वामी समर्थ मंदिरात आमदार अमोल खताळ यांनी भेट देत साईबाबा व श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी महाआरतीत सहभागी होत राज्याच्या तसेच सर्व नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. गुरुपौर्णिमेनिमित्त मंदिरात विशेष धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, नामस्मरण आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावली. साईनामाच्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. महाआरतीनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी आमदार खताळ यांनी मंदिर परिसरातील भाविकांशी संवाद साधत सर्वांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. गुरुंच्या कृपाशीर्वादाने प्रत्येकाच्या जीवनात ज्ञान, सद्बुद्धी, आरोग्य, यश आणि आनंद नांदो, अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी मंदिराचे विश्वस्त, पदाधिकारी, महायुतीचे कार्यकर्ते, विविध मान्यवर तसेच असंख्य साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आई-वडील, शिक्षक, समाजासोबत निसर्ग देखील आपला गुरु : इंजि. खर्डे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आपले प्रथम गुरु आई-वडील, त्यानंतर शिक्षक आणि समाज आपल्याला घडवत असतो. मात्र, या सर्वांसोबतच निसर्गदेखील आपला महान गुरु आहे. निसर्गाकडून आपण सातत्य, चिकाटी, संघर्ष आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन इंजि. नानासाहेब खर्डे यांनी केले.

मातोश्री रु दा मालपाणी विद्यालयात आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जीवनात गुरुचे महत्त्व, शिक्षणाची भूमिका आणि संघर्षातून यश संपादन करण्यासाठी आवश्यक असलेली जिद्द याविषयी मार्गदर्शन केले. पुढे बोलताना निळवंडे धरणाचे शिल्पकार इंजि. खर्डे ( अध्यक्ष, हनुमान शै. व सां . मंडळ, झोळे )यांनी निळवंडे धरणाच्या निर्मितीचा संघर्षमय प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. धरणाच्या बांधकामादरम्यान आलेल्या अनेक अडचणींवर मात करत विविध समस्यांवर मार्ग काढत हे महत्त्वाकांक्षी काम पूर्णत्वास नेण्यात आले, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मुंगीचे उदाहरण देत तिच्याकडून मिळणाऱ्या चिकाटीचा धडा विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. तसेच उद्योगपती रतन टाटा यांच्याशी संबंधित मजूर आणि अधिकारी यांच्यातील एक रंजक किस्सा सांगत प्रत्येक व्यक्तीच्या कामाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमासाठी पालक प्रतिनिधी मा प्रा. रवींद्र गोफणे, (उपप्राचार्य, नूतन महाविद्यालय, राजापूर ) तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक मा उत्तम एरंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गुरुंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा उत्तम एरंडे यांनी केले. यावेळी विद्यार्थी शिवम कृष्णा पंचारिया, श्रवण निलेश पवार, राजेश्वरी बंडू वाकचौरे आणि श्रीधर प्रतापराव ठोंबरे यांनी गुरुंच्या महतीचे वर्णन करणारी मनोगते व भाषणे सादर केली.

याप्रसंगी पालक प्रतिनिधी प्रा. रवींद्र गोफणे यांनी आपल्या मनोगतात आई-वडिलांचा सदैव मान-सन्मान राखण्याचे आवाहन केले. गुरु आपल्या पावलोपावली सोबत असतात. गुरु आपल्याला ज्ञान देतात आणि त्या ज्ञानाचा उपयोग करून जीवन समृद्ध करणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले. शिक्षणाच्या माध्यमातून सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविणे ही काळाची गरज असून, त्यासाठी गुरुंची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. वृद्धापकाळात आई-वडिलांची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असा मौलिक संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. मा मदन अरगडे यांनी गुरुची महती सांगणारी कविता सादर केली .

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# दिगंबर सराफ विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील दिगंबर सराफ विद्यालय व ओहरा ज्युनियर कॉलेज येथे गुरुपौर्णिमा, व्यास पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त प्राचार्य श्री भारत कुटे सर यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना गुरु शिष्याचे नाते अतूट असते ते जपले पाहिजे. शिष्यामध्ये कोणताही अहंकार नसावा कायम गुरूबद्दल आदर असावा. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर गुरूंचे मार्गदर्शन महत्त्वाचे असते ते कायम घेणे गरजेचे असते हे अनेक उदाहरणांमधून स्पष्ट केले. विद्यालयाचे प्राचार्य श्री जाधव सर यांनी आपल्या प्रास्ताविकात गुरुपौर्णिमेचे महत्त्व विद्यालयातील विविध उपक्रम व प्रकल्पाची माहिती दिली. कार्यक्रमात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले मार्गदर्शक शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पर्यवेक्षक श्री बैरागी सर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रभावी सूत्रसंचालन श्रीमती मुळे मॅडम केले . श्री मांडेकर सर यांनी आभार मानले. कार्यक्रमास उप प्राचार्य वालझाडे सर सर्व शिक्षक, प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# आपले सरकार सेवा केंद्र रेंज साईड तात्काळ चालू करा - ग्राहक पंचायत



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले आदिवासी तालुक्यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्ज मुक्ती योजना २०२६ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करताना अकोले तालुक्यातील शासकीय सुविधा केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र (सेतु) मधिल साईड बंद (सतत) असल्या बाबत व साईड तात्काळ चालू होण्याबाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे निवासी नायब तहसिलदार किसन लोहरे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक सचिव राम रुद्रे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्ज मुक्ती योजना २०२६ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचे शासनाने या योजनेच्या अंमलबजावणीचे कामकाज सुरु आहे सदर योजने अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची पहिली यादी महा-आयटी यांनी विकसित केलेल्या संगणकीय पोर्टलवर प्रसिद्ध झालेली आहे. लाभार्थी शेतकऱ्यांना तात्काळ लाभ देण्यासाठी आधार (लिंकिंग) प्रामाणीकरण करणे गरजेचे, आवश्यक आहे.

तसेच यादितील पात्र लाभार्थी शेतकरी यांनी आपले सरकार सेवा केंद्रातुन त्यांचे बँक खाते, खात्याचे आधार प्रमाणीकरण करताना त्यांच्या कडून कोणत्याही प्रकारचे शुल्क (पैसे) आकारण्यात येऊ नये याबाबत जिल्हाधिकारी यांचा आदेश जारी सर्व आपले सरकार सेवा केंद्र(सेतू) चालकांना सुचित केले आहे. कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारू नये असे शासनाने सुचित केल्या मुळे सेतु मधिल रेंज साईड बंद आहे काय? असा प्रश्न पात्र शेतकरी ग्राहकांचा संभ्रम झाला आहे.

वरिल संभ्रम काढण्यासाठी शेतकरी ग्राहक यांना शासकिय सुविधा केंद्र / आपले सरकार सेवा केंद्रा मधिल रेंज साईट तात्काळ चालू होण्यासाठी संबधितांना आदेश देण्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, सचिन राम रूद्रे ,अध्यक्ष दत्ता शेनकर विठ्ठल उघडे, ज्ञानेश्वर पुंडे, भाऊसाहेब वाकचौरे यासह आदिंचे नावे आहे.


HAPPY Birthday



मा. श्री. शैलेंद्र साबळे
संचालक, लिना बिझनेस ग्रुप



मा. श्री. गणेश मादास
सं.न.पा. चे माजी नगरसेवक



मा. श्री. अमित चव्हाण
शिवसेनाप्रणीत युवासेनेचे उत्तर नगर जिल्हा प्रमुख



मा. श्री. प्रविण दिड्डी
उद्योजक व सीए



मा. प्रा. डॉ. अमोल मेहेत्रे
अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हील विभागाचे सहायक प्राध्यापक



मा. श्री. सत्यजीत सराफ
संगमनेर



मा. श्री. चंद्रकांत भालेराव
लिपीक तलाठी कार्यालय हिवरगाव पावसा

शुभेच्छुक
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# पेपरफुटीसारख्या समस्येवर 'जलदगती न्यायालय' हा प्रभावी उपाय ठरू शकतो काय ?

देशभरात वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य, परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास आणि प्रशासनाची विश्वासार्हता यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटीच्या गुन्ह्यांची जलद सुनावणी करण्यासाठी 'जलदगती न्यायालये स्थापन करण्याची घोषणा केली.मात्र,हा निर्णय पेपरफुटीवर अंतिम उपाय आहे का, की व्यापक सुधारणेतील एक महत्त्वाचा घटक? याचा वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे.

जलदगती न्यायालय म्हणजे काय?

जलदगती न्यायालये ही स्वतंत्र न्यायव्यवस्था नसून नियमित न्यायालयीन व्यवस्थेचाच एक विशेष भाग आहेत.गंभीर व सार्वजनिक हिताच्या प्रकरणांना प्राधान्य देऊन त्यांची जलद सुनावणी व लवकर निकाल देण्यासाठी ही न्यायालये स्थापन केली जातात.बलात्कार, पोक्सो,आर्थिक गुन्हे किंवा इतर संवेदनशील प्रकरणांमध्ये अशा न्यायालयांचा वापर करण्यात येतो. २ ऑक्टोबर २०१९ पासून केंद्र सरकारने बलात्कार व पोक्सो प्रकरणांसाठी Fast Track Special Courts (FTSC) योजना सुरू केली.

सध्यस्थीतीत जलद गती विशेष न्यायालयांची योजना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढवली आहे.एप्रिल २०२६ पर्यंत २९ राज्ये व ९ केंद्रशासित प्रदेशांमध्ये ७७५ न्यायालये सुरू आहेत,ज्यामध्ये ३९८ झजउडज(बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक) न्यायालयांचा समावेश आहे. प्रत्येक न्यायालयाने वर्षाला कमीत कमी १६५ प्रकरणांचा निपटारा करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. देशभरात शेकडो विशेष न्यायालये कार्यरत असून त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रकरणांचा निपटारा केला केला जात असला तरी प्रलंबित प्रकरणांची संख्या अजूनही लक्षणीय आहे. यावरून केवळ स्वतंत्र न्यायालये निर्माण केल्याने सर्व समस्या सुटत नाहीत,हे स्पष्ट होते.

**पेपरफुटीसाठी जलदगती न्यायालयांची गरज**

पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये अनेकदा न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे चालते. परिणामी दोषींना शिक्षा उशिरा होते आणि भविष्यातील गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण होत नाही. जलदगती न्यायालयांमुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत:


**दोषींना कमी कालावधीत शिक्षा होईल.**

- ✻ गुन्हेगारांवर प्रभावी प्रतिबंध (ऊाींशीीशपलश) निर्माण होईल.
- ✻ विद्यार्थी आणि पालकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढेल.
- ✻ परीक्षांच्या पारदर्शकतेला बळ मिळेल.

सार्वजनिक संस्थांची उत्तरदायित्वाची भावना वाढेल.

**पण केवळ जलद न्यायालय पुरेसे का नाही?**

न्यायालयाचा वेग हा तपासाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. तपास अपुरा असेल, पुरावे कमकुवत असतील किंवा मुख्य सूत्रधारांपर्यंत तपास पोहोचला नाही, तर जलद न्यायालयही प्रभावी निकाल देऊ शकणार नाही. आजची पेपरफुटी ही केवळ प्रश्नपत्रिका लीक होण्यापुरती मर्यादित नसून ती एक संघटित गुन्हेगारी साखळी बनली आहे. प्रश्नपत्रिका तयार करणे,छपाई वाहतूक,डिजिटल सर्व्हर, परीक्षा केंद्रे,आयटी सेवा पुरवठादार, आर्थिक व्यवहार आणि दलाल यांचा त्यात समावेश असतो.त्यामुळे तपास यंत्रणेकडे आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल फॉरेन्सिक,आर्थिक तपास आणि सायबर कौशल्य असणे अत्यावश्यक आहे.




कायदेशीर चौकट आधीपासून अस्तित्वात आहे.

सार्वजनिक परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी Public :Examinations (Prevention of Unfair Means) Act, २०२४ हा कायदा २१ जून २०२४ पासून लागू आहे.

या कायद्यानुसार पुढील कृत्यांना कठोर शिक्षा व दंडाची तरतूद आहे:

- ✻ प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका लीक करणे.
- ✻ परीक्षार्थ्यांना अनधिकृत मदत करणे
- ✻ संगणकीय प्रणालीमध्ये फेरफार करणे
- ✻ बनावट परीक्षा आयोजित करणे
- ✻ संघटित गुन्हेगारीद्वारे परीक्षा प्रक्रियेत हस्तक्षेप करणे

म्हणून कायद्याचा अभाव नसून, त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि जलद न्याय ही खरी गरज आहे.

पेपरफुटी रोखण्यासाठी आवश्यक व्यापक सुधारणा

जलदगती न्यायालय गुन्हा घडल्यानंतर काम करते; पण विद्यार्थ्यांचे नुकसान त्याआधीच झालेले असते. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय अधिक महत्त्वाचे आहेत.

**यासाठी पुढील उपाय आवश्यक आहेत:**

- ✻ प्रश्नपत्रिकेची संपूर्ण डिजिटल सुरक्षा व एन्क्रिप्शन.
- ✻ परीक्षा प्रक्रियेचे नियमित सुरक्षा ऑडिट.
- ✻ परीक्षा संस्था व सेवा पुरवठादारांची निश्चित जबाबदारी.
- ✻ कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) व सायबर मॉनिटरिंगचा वापर.
- ✻ आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करून मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचणे.
- ✻ दोषी अधिकारी, कर्मचारी व संस्थांवर कठोर प्रशासकीय कारवाई.
- ✻ व्हिसलब्लोअर संरक्षण आणि गोपनीय तक्रार व्यवस्था.

(व्हिसल ब्लोअर (Whistleblower) ही अशी व्यक्ती आहे जी एखाद्या खाजगी किंवा सरकारी संस्थेतील भ्रष्टाचार, बेकायदेशीर कृती, फसवणूक किंवा सुरक्षेला असलेला धोका उघड करते.भारतामध्ये अशा व्यक्तींच्या संरक्षणासाठी (व्हिसल ब्लोअर्स प्रोटेक्शन ॲक्ट २०१४)आहे, ज्यामुळे ते सुरक्षितपणे चूकांविरुद्ध आवाज उठवू शकतात.)

✻ परीक्षांचे पारदर्शक व उत्तरदायी व्यवस्थापन.

**निष्कर्ष-**

पेपरफुटी हा केवळ कायद्याचा प्रश्न नाही;तो प्रशासन,तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा एकत्रित विषय आहे.जलदगती न्यायालये दोषींना वेळेत शिक्षा देण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात आणि त्यातून प्रतिबंधात्मक संदेशही जाईल.मात्र,केवळ न्यायालये स्थापन करून पेपरफुटी पूर्णपणे थांबणार नाही.सक्षम तपास, अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था,कठोर अंमलबजावणी,तांत्रिक सुधारणा आणि परीक्षा व्यवस्थेतील व्यापक बदल यांची जोड मिळाली तरच विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण होईल. थोडक्यात,जलदगती न्यायालये ही पेपरफुटीनंतर न्याय मिळवण्याची प्रभावी यंत्रणा आहे;परंतु पेपरफुटी होऊच नये यासाठी सक्षम परीक्षा व्यवस्था,पारदर्शक प्रशासन आणि कठोर अंमलबजावणी हीच दीर्घकालीन व शाश्वत उपाययोजना ठरेल.



**ॲड. अजिंक्य सुषमा सुहास उपासनी**
संपर्क-९७३०५९९२३१

## संपादकीय...

# शहरांचा विस्तार आणि पर्यावरण संवर्धनाचा समतोल

भारतासह जगभरात शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढत आहे. लोकसंख्या वाढ, उद्योगधंद्यांचा विस्तार, रोजगाराच्या संधी, शिक्षण, आरोग्य आणि आधुनिक सुविधांच्या शोधात ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे शहरांची सीमा दिवसेंदिवस वाढत आहे. नवीन रस्ते, उड्डाणपूल, निवासी संकुले, औद्योगिक वसाहती आणि व्यावसायिक इमारती उभ्या राहत आहेत. हा विकास आवश्यक असला तरी त्याची किंमत पर्यावरणाला मोजावी लागत आहे. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे ही आजची सर्वात मोठी गरज बनली आहे. शहरांचा विस्तार हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा निर्देशक मानला जातो. विकसित पायाभूत सुविधा, रोजगाराच्या संधी आणि गुंतवणूक यामुळे शहरांची प्रगती होते. मात्र, अनियोजित शहरीकरणामुळे वृक्षतोड, जलस्त्रोतांचे प्रदूषण, हवेतील प्रदूषण, उष्णतेत वाढ, जैवविविधतेचा ऱ्हास आणि कचऱ्याच्या समस्यांसारखी गंभीर आव्हाने निर्माण होत आहेत. शहरांच्या विकासाचा वेग जितका वाढतो, तितक्याच वेगाने नैसर्गिक संसाधनांवर ताण निर्माण होतो. आज अनेक शहरांमध्ये काँक्रीटचे जंगल तयार झाले आहे. मोठमोठ्या इमारतींसाठी हजारो झाडे तोडली जातात. परिणामी पक्ष्यांचे अधिवास नष्ट होतात, भूजलपातळी खालावते आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी रस्त्यांवर साचते. त्यामुळे पूरस्थिती निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. दुसरीकडे वाहनांची संख्या झपाट्याने वाढल्याने वायू प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणही चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शहरांचे नियोजन अधिक संवेदनशील होणे आवश्यक आहे. प्रत्येक शहराने हरित क्षेत्र वाढविण्यावर भर दिला पाहिजे. सार्वजनिक उद्याने, वृक्षलागवड, खुल्या जागांचे संरक्षण आणि नदी-तलावांचे पुनरुज्जीवन या उपाययोजना शहरांना अधिक पर्यावरणपूरक बनवू शकतात. केवळ विकास प्रकल्प उभारणे पुरेसे नाही, तर त्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम लक्षात घेऊन नियोजन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. शाश्वत विकास हीच यावरची प्रभावी संकल्पना आहे. विकास करताना नैसर्गिक संसाधनांचे जतन, ऊर्जा बचत आणि प्रदूषण नियंत्रण यांचा विचार करणे आवश्यक आहे. सौरऊर्जा, पावसाच्या पाण्याचे संकलन, सांडपाण्याचे पुनर्वापर, कचऱ्याचे वर्गीकरण आणि पुनर्प्रक्रिया, हरित इमारती आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य दिल्यास पर्यावरणाचा समतोल राखता येईल. याशिवाय सायकल ट्रॅक, पादचारी मार्ग आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन दिल्यास प्रदूषणात लक्षणीय घट होऊ शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. शहर विकास आराखड्यात पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देणे, बेकायदेशीर बांधकामांवर नियंत्रण ठेवणे, जलस्त्रोतांचे संरक्षण करणे आणि हरित पट्टे विकसित करणे ही त्यांची जबाबदारी आहे. प्रत्येक मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करूनच परवानगी दिली पाहिजे. विकासाच्या नावाखाली नद्या, डोंगर, जंगल आणि ओलसर प्रदेश नष्ट होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. नागरिकांचाही सक्रिय सहभाग तितकाच आवश्यक आहे. प्रत्येकाने झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाणी व वीज बचत करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि सार्वजनिक स्वच्छतेत योगदान देणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार केल्यास शहरांचा विकास अधिक संतुलित होऊ शकतो. स्मार्ट सिटीची संकल्पना केवळ डिजिटल तंत्रज्ञानापुरती मर्यादित नसून ती पर्यावरणपूरक शहर उभारण्याची संकल्पना आहे. हरित इमारती, स्मार्ट जलव्यवस्थापन, स्वच्छ ऊर्जा, प्रभावी कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधतेचे संरक्षण या घटकांशिवाय कोणतेही शहर खऱ्या अर्थाने स्मार्ट ठरू शकत नाही. भविष्यातील शहरे नागरिकांना केवळ सुविधा देणारी नव्हे, तर निरोगी आणि सुरक्षित जीवन देणारी असावीत. आज विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समन्वयाची गरज आहे. विकासाला विरोध करून प्रगती साधता येणार नाही, तसेच पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून विकासही टिकणार नाही. दोन्हींचा सुवर्णमध्य साधणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे. नियोजनबद्ध शहरीकरण, हरित तंत्रज्ञानाचा वापर, कठोर पर्यावरणीय नियम आणि नागरिकांचा सहभाग या चार आधारस्तंभांवरच भविष्यातील शहरांची उभारणी व्हायला हवी.


SUBSCRIBE
DAINIK YUVAVARTA
YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# शिष्यवृत्ती परीक्षेत निळवंडे शाळेतील मुलांचे यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केलेल्या एप्रिल २०२६ मधील पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता चौथी व सातवी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निळवंडे येथील मुलांनी घवघवीत यश मिळवले आहे. शाळेचे मुख्याध्यापक रमेश निघूते यांच्या मार्गदर्शनाखाली वर्गशिक्षिका मंदा कडलग - गायकर, तुषार फल्ले, संजय एरंडे व शिष्यवृत्तीचे तज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग यांनी केलेल्या नियोजनाला चांगले यश मिळाले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने नुकताच अंतरिम निकाल जाहीर केला असून शाळेतील तब्बल २२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत.

इयत्ता चौथीच्या वर्गातील पुनम गणेश आहेर (२५०), अक्षरा शाम पवार (२४६), यश नानासाहेब पवार (२४४), गौरी रावसाहेब पवार (२४२), स्वरा राजेंद्र पाचारणे (२२६), स्वरा सुधीर पवार (२२६), काव्या सतीश पवार (२१६), जीवन रोहिदास आहेर (२१४), साईश्वरी सोमनाथ आहेर (२०६), कृष्णा प्रकाश पवार (२०४), श्रेयस दत्तात्रय केरे (१९८), अनन्य विलास पवार (१७८), रुद्र सचिन सोनवणे (१७८), अनुष्का सुदाम उकिरडे (१४०), कैवल्य राजेंद्र केरे (१३८), सानिका संदीप पवार (१२६) तर सातवीच्या वर्गातील अनुज तुषार फल्ले (२५०), गायत्री रामनाथ केरे (२२६), सोहम बाळासाहेब पवार (२२०), प्रिया सतीश भोसले (१६२), आराध्या मुक्ताहरी दवंगे (१६०), पूर्वा दत्तात्रय केरे (१४२) गुण मिळवून परीक्षेत पात्र ठरले आहेत.

शिष्यवृत्तीचे तज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग यांनी प्रत्येक रविवार व शाळेच्या सुट्टीच्या दिवशी जादा तास घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सातत्य, जिद्द, चिकाटी, मेहनत व सराव या पंचसूत्रीचा वापर करत विद्यार्थ्यांकडून प्रत्येक विषयाचे १५० पेक्षा जास्त पेपर सोडवून घेतले. त्यामुळेच शाळेतील विद्यार्थ्यांना घवघवीत यश प्राप्त झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत, केंद्रप्रमुख आशा घुले, गावचे सरपंच शशिकला पवार, उपसरपंच भाऊसाहेब आहेर, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवाजी आहेर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय आहेर, माजी अध्यक्ष रावसाहेब वारे, पोपटराव पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष उत्तमराव पवार, प्रकाश पवार, शाळेतील शिक्षक कैलास दिघे, अनिल गाडेकर, सौदामिनी सोनवणे आदींनी अभिनंदन केले आहे.

# साई मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात


छाया – प्रसाद सुतार, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर - येथील प्रवरा नदीच्या तीरावर वसलेल्या श्री साई मंदिरात गुरुपौर्णिमेच्या उत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी परिसरातील शेकडो भाविकांनी साईबाबांच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर पहाटेच्या सुमारास श्री साईबाबांच्या मूर्तीस अत्यंत भक्तिमय वातावरणात 'लघु रुद्र अभिषेक' घालून महाआरती करण्यात आली. यानंतर दिवसभरातील इतर धार्मिक व पारंपरिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. या उत्सवातील विशेष आकर्षण म्हणजे श्री साईबाबांना लोकमान्य टिळकांनी भेट दिलेला ऐतिहासिक शैल्य (शाल) पालखीत ठेवून घडवून आणलेली 'संत भेट'. या वेळी ढोल-ताशांचा गजरा, पारंपरिक वीज-वाद्ये आणि सजवलेल्या घोड्यांच्या लवाजम्यासह भव्य मिरवणूक काढण्यात आली. या सोहळयात महिलांनी उत्स्फूर्तपणे फुगड्या खेळत आनंदोत्सव साजरा केला. संत भेटीनंतर मंदिरात श्री सत्यनारायण महापूजा विधीवत संपन्न झाली. ज्या भाविकांनी यंदा प्रथमच श्री साईसच्चरित्र ग्रंथाचे पारायण पूर्ण केले, अशा सर्व भाविकांना मंदिर समितीच्या वतीने पवित्र 'श्री साईसच्चरित्र' ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले. दिवसभराच्या विविध धार्मिक विधींनंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे (भंडारा) आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.दिवसभर चाललेल्या या विविध धार्मिक व पारंपरिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण प्रवरा नदीचा परिसर भक्तिमय वातावरणाने उजळून निघाला होता.

# भारतरत्न राजीव गांधी विद्यालयात बालसंसदेचा शपथविधी उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतरत्न राजीव गांधी विद्यालय, निमज येथे मंगळवार (दि. २१ जुलै २०२६) रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यालयाच्या बालसंसदेचा शपथविधी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जपणूक व्हावी, नेतृत्वगुण विकसित व्हावेत आणि प्रत्यक्ष अनुभवातून प्रशासनाची ओळख व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल व पं. रा. कानवडे ज्युनिअर कॉलेज, निमगाव पागाचे प्राचार्य श्री. उद्धव उगले आणि पं. जवाहरलाल नेहरू विद्यालय, पेमगिरीचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश गोडसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली. विद्यालयाच्या शाळास्तरीय बालसंसदेसाठी पंतप्रधान, शिक्षणमंत्री, क्रीडामंत्री, सांस्कृतिक मंत्री व आरोग्यमंत्री, तर प्रत्येक वर्गासाठी मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, क्रीडामंत्री, आरोग्यमंत्री आणि सांस्कृतिक मंत्री या पदांसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य श्री. उद्धव उगले म्हणाले, विद्यार्थीदशेत मिळालेली जबाबदारी ही भविष्यात आदर्श नागरिक घडण्याची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी पदाचा सन्मान राखत शपथेनुसार प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडावी.

मुख्याध्यापक श्री. प्रकाश गोडसे यांनी निवडून आलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, निवडणुकीत पराभूत झालेल्या विद्यार्थ्यांनी निराश न होता आपल्या गुणवत्तेच्या आणि कार्यक्षमतेच्या बळावर पुढील वर्षी अधिक जोमाने प्रयत्न करावेत. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अविनाश कानवडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता लोकशाही व्यवस्था आणि प्रशासनाची प्रत्यक्ष अनुभूती देणे, हा बालसंसदेचा मुख्य उद्देश आहे.

# नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात

राजापूर : प्रागतिक शिक्षण संस्थेच्या नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजापूर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे तसेच गुरूंप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजनंदिनी घुले यांनी केले. कोमल रूपवते व संचिता हासे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब वर्पे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांच्या जीवनातील गुरुचे स्थान, गुरुचे मार्गदर्शन आणि गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विशद केले.

या कार्यक्रमासाठी कला व सांस्कृतिक मंडळाच्या प्रा. सोनाली देशमुख तसेच विद्यार्थी विकास मंडळाचे प्रा. पी. बी. आहेर यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. अर्चना साबळे, उपप्राचार्य प्रा. संगीता जांगीड, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. रेखा गुंजाळ, कला विभागप्रमुख प्रा. चंद्रकांत हारदे, खट-उ समन्वयक प्रा. प्रल्हाद भालके यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

गुरूंप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करत तसेच गुरु-शिष्य परंपरेचा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
Shaikh Ehsan Gufran

NEW NAME AS
Ehsaan Gufran Shaikh

ADD - Naikwadpura Near Anglo Urdu High School Sangamner- 422605 Dist- Ahilyanagar

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी
सेल्समन- २ जागा (पुरूष)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(कामाची वेळ सकाळी १० ते रात्री १०/ पार्ट टाईम )
(अनुभवास प्राधान्य व आकर्षक पगार )
मेन्स स्टुडिओ
नाशिक-पुणे हायवे लॉ कॉलेज समोर, संगमनेर
8830437076
9822882399

**पाहिजेत**
क्षितिज इलेक्ट्रीकल
घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally
ज्ञान आवश्यक
- संपर्क -
7007608875

**पाहिजेत**
मोरया टॉइज व गिफ्ट शॉप
दुकान कामासाठी होतकरु कामगार पाहिजे
शिक्षण- किमान १० वी
पत्ता- पोफळे मळा, अभंग पेट्रोल पंप समोर
9767880009

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397

**फॅकल्टी पाहिजे** | अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727









# 'कुटे हॉस्पिटल'मध्ये ESIC योजनेचा शुभारंभ !

## कामगार व विमाधारकांच्या आरोग्यासाठी कुटे हॉस्पिटलचे कार्य कौतुकास्पद; आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर येथील नवीन नगर रोड येथील 'कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर' मध्ये केंद्र सरकारच्या 'कर्मचारी राज्य विमा निगम' (ESIC) या महत्त्वपूर्ण योजनेचा भव्य शुभारंभ करण्यात आला. या योजनेचे शानदार उद्घाटन संगमनेर विधानसभेचे आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

या योजनेमुळे आता संगमनेर शहर व परिसरातील कामगार वर्ग, विमाधारक व त्यांच्या कुटुंबांना मोफत वैद्यकीय उपचार, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, आवश्यक तपासण्या, औषधोपचार आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत.

यावेळी कुटे हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. प्रदीप कुटे व व्यवस्थापनाच्या वतीने आमदार अमोल खताळ यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार अमोल खताळ यांनी अत्यंत भावनिक मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, गोरगरीब, कष्टकरी आणि कामगार वर्गाला दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. कुटे हॉस्पिटलने ESIC योजना सुरू करून समाजातील या घटकांसाठी अत्यंत कौतुकास्पद आणि मोठे सामाजिक कार्य केले आहे. सर्वसामान्य रुग्णांना वेळेत व सर्वोत्तम उपचार मिळावेत यासाठी शासन स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांमध्ये कुटे हॉस्पिटल: कुटे हॉस्पिटलच्या संचाचे डॉ. सोनाली कुटे, सोनाली दादासाहेब कुटे, शितल संदीप कुटे, संगमनेर दूध उत्पादक सोसायटीचे माजी चेअरमन दादासाहेब कुटे, प्रदीप मेडिकलचे सुनील गागरे, रोहिणी गागरे, डॉ. फहिमुद्दीन शेख, डॉ. विशाल पटेल, डॉ. आनंद पारिख, डॉ. कोमल गवांदे, डॉ. मारिया शेख, डॉ. सोहेल पठाण, डॉ. कुणाल पाटील, डॉ. नेहा पाटील, डॉ. रिनप्रीत कौर पंजाबी, डॉ. अतुल गुंजाळ, डॉ. सागर गांडोळे (सायखिंडी सोसायटी चेअरमन) आणि मॅनेजर अण्णासाहेब थोरात यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्या पुढाकारातून संगमनेरमध्ये भक्तिभावात गुरुपौर्णिमा उत्सव



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव संगमनेर शहरात मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संगमनेरच्या नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि 'I Love Sangamner च्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना नागरिक आणि भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

गुरुपौर्णिमे निमित्त शहरातील दत्त मंदिर (बस स्टँड), स्वामी समर्थ केंद्र (म्हाळुंगी पूल) तसेच गंगामाता मंदिर (गंगामाई घाट) येथे विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. मैथिली तांबे यांनी विविध मंदिरांना भेट देऊन श्री दत्त महाराज, श्री स्वामी समर्थ आणि गंगामातेचे दर्शन घेत विधीवत पूजन केले. सर्व नागरिकांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी मनोभावे प्रार्थना केली.

याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसाद कार्यक्रमात उपस्थित राहून डॉ. मैथिली तांबे यांनी भाविकांना स्वतः महाप्रसादाचे वाटप केले. मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि लहान मुलांशी त्यांनी मनमोकळा संवाद साधत सर्वांना गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. मोठ्या संख्येने भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमात सहभाग नोंदवत भक्तिमय वातावरणाचा आनंद घेतला. गुरु म्हणजे केवळ शिक्षण देणारी व्यक्ती नसून जीवनाला योग्य दिशा देणारा, संस्कारांची शिकवण देणारा आणि समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेणारा दीपस्तंभ आहे. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या विचारांचा आणि संस्कारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करावा, असा संदेश यावेळी देण्यात आला.

I Love Sangamner' या माध्यमातून शहरात सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबविले जात असून, गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून अध्यात्म, सामाजिक एकात्मता आणि सेवाभावाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. धार्मिक परंपरा जपत समाजात सकारात्मक विचार, बंधुभाव आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

# गणवेश शिवले... पण पैसे अडकले ! जिल्ह्यात तब्बल ४.७३ कोटींचा निधी परत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेश मिळावेत, यासाठी शासनाकडून मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, प्रशासकीय दिरंगाई आणि नव्या ऑनलाइन प्रणालीतील अडचणींमुळे जिल्ह्यातील गणवेशासाठीचा तब्बल ४ कोटी ७३ लाखांचा निधी शासनाकडे परत गेल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. याचा फटका विद्यार्थ्यांसह गावागावातील टेलर आणि शालेय व्यवस्थापन समित्यांनाही बसला आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दोन गणवेश देण्याची योजना आहे. यंदा गणवेश पुरविण्याची जबाबदारी शालेय व्यवस्थापन समित्यांकडे देण्यात आली होती. एका गणवेशासाठी २४० प्रमाणे जिल्ह्यासाठी ४.७३ कोटींचा निधी मंजूर होऊन तो तालुकास्तरावर वर्गही करण्यात आला होता.

शालेय व्यवस्थापन समित्यांनी अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांचे गणवेश शिवून घेतले. मात्र, त्यांची देयके वेळेत मंजूर झाली नाहीत. काही मुख्याध्यापकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेली बिले परत घेण्यास सांगितल्याने ती परत नेण्यात आली. आता जिल्हा परिषद प्रशासन मात्र मुख्याध्यापकांनी निधी खर्च केला नसल्याचा ठपका ठेवत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, गावागावातील टेलरांनी उधारीवर गणवेश शिवून दिले. मात्र, पैसे न मिळाल्याने ते आता मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांच्या दारात हेलपाटे मारत आहेत. दररोज आज-उद्या पैसे मिळतील असे आश्वासन मिळत असले तरी प्रत्यक्षात देयके मिळालेली नाहीत. त्यामुळे अनेक टेलर आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

गणवेशाची बिले तालुकास्तरावर वेळेत सादर न झाल्याने आणि त्याचदरम्यान राज्य शासनाने जुनी पीएफएमएस प्रणाली बंद केल्याने निधी खर्च होऊ शकला नाही. परिणामी, संपूर्ण रक्कम शासनाकडे परत गेली. आता राज्य शासनाने 'एसएमएस स्पर्श' ही नवी आर्थिक प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमध्ये प्रत्येक शाळेला नव्याने बँक खाते नोंदणी करावी लागत असून, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि मुख्याध्यापकांचे पॅन क्रमांक जोडणे आवश्यक आहे. अनेक शाळांची बँक खाती अद्याप सुरूच झालेली नसल्याने निधी वितरणाची प्रक्रिया रखडली आहे.

# घरकुल लाभार्थ्यांसाठी व्हॉट्सअ‍ॅप सेवा सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांच्या प्रलंबित हप्त्यांची प्रक्रिया अधिक जलद आणि सुलभकरण्यासाठी पंचायत समिती संगमनेरने व्हॉट्सअ‍ॅप सेवा सुरू केली आहे. घरकुल योजनांतील मंजूर लाभार्थ्यांसाठी ९३२५६१५६९६ हा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक दिला आहे. घरकुलाचा संबंधित टप्पा पूर्ण झाला असूनही हप्ता मिळालेला नसल्यास लाभार्थ्यांनी घराच्या सद्यस्थितीचे स्पष्ट छायाचित्र पाठवावे, असे आवाहन गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी केले आहे.

गटविकास अधिकारी सिनारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लाभार्थ्यांनी व्हॉट्सअ‍ॅपवर छायाचित्र पाठविताना

त्यासोबत लाभार्थ्यांचे पूर्ण नाव, गावाचे नाव, संबंधित घरकुल योजनेचे नाव आणि आवश्यक माहिती नमूद करावी. प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी करून प्रलंबित हप्त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. घरकुल योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान, पारदर्शक आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक माहिती व घराच्या सद्यस्थितीची स्पष्ट छायाचित्रे तत्काळ व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर पाठवून या सेवेचा लाभ घ्यावा, घरकुल योजना अधिक प्रभावी राबविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान प्राप्त झालेल्या माहितीची दोन दिवसांच्या आत प्रत्यक्ष पाहणी केली जाईल. पाहणीनंतर लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम संबंधित टप्प्यानुसार पूर्ण झाल्याचे निदर्शनास आल्यास, नियमानुसार त्यांचा प्रलंबित हप्ता तातडीने मंजूर करून निधी वर्ग करण्याची कार्यवाही केली जाईल.

असे पंचायत समिती गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी म्हटले आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

अत्याधुनिक लॅमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
• मेंदुविकार शस्त्रक्रिया • किडनी शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण • मुत्रविकार शस्त्रक्रिया
• गुडघा प्रत्यारोपण • दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
• पोटाच्या शस्त्रक्रिया • आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथूनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
अँब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

**पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?**

**ताम्हाणे हॉस्पिटल**

आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध

पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)

आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी

फोन नं. ०२४२५-२२००५०

संपर्क - 7219100100

सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी

पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक **युवावार्ता**

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



**आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा**

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०




# कै. निवृत्ती गणपत गवळी (माजी सैनिक) यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## देशासाठी जगलेले आयुष्य... संस्कारांचा अमूल्य वारसा देऊन गेलेले आमचे दादा







देशसेवा हीच सर्वोच्च सेवा हे वाक्य अनेकजण उच्चारतात; परंतु ते आपल्या आयुष्याने सिद्ध करणारी माणसे फारच थोडी असतात. आमचे वडील, कै. निवृत्ती गणपत गवळी हे त्यापैकीच एक होते. त्यांनी संपूर्ण आयुष्य देशासाठी, कुटुंबासाठी आणि समाजासाठी समर्पित केले. आज ते आमच्यात नसले तरी त्यांचे विचार, त्यांचे संस्कार, त्याग आणि कर्तव्यनिष्ठा आम्हाला प्रत्येक क्षणी प्रेरणा देत राहतील.


कै. निवृत्ती गणपत गवळी यांचा जन्म २० मे १९४३ रोजी संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे झाला. आई सोन्याबाई आणि वडील गणपत रामभाऊ गवळी यांच्या पोटी ते ज्येष्ठ सुपुत्र होते. घरात मोठे कुटुंब, शेती अल्प आणि आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची. वडील पारंपरिक शेती करत होते; मात्र कष्ट जास्त आणि उत्पन्न कमी. त्यामुळे लहानपणापासूनच संसाराची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली.

प्राथमिक शिक्षण त्यांनी वडगाव पान येथे सातवीपर्यंत पूर्ण केले. शिक्षणानंतर त्यांनी घरच्या परिस्थितीला हातभार लावण्यासाठी मोलमजुरी, विहिरी खोदण्याची कामे आणि मिळेल ते श्रमाचे काम केले. शरीराने धष्टपुष्ट, मनाने खंबीर आणि विचाराने राष्ट्रभक्त असलेल्या दादांच्या मनात मात्र एकच स्वप्न होते-भारतीय सैन्यात भरती होऊन मातृभूमीची सेवा करण्याचे. घरच्यांचा विरोध असल्याने त्यांना हे स्वप्न पूर्ण करणे सोपे नव्हते. पण देशप्रेमापुढे सर्व अडथळे लहान वाटले. एके दिवशी कामाला जातो असे सांगून त्यांनी थेट नाशिक गाठले आणि ४ डिसेंबर १९६३ रोजी भारतीय सैन्याच्या २१६ अर्टिलरी तोफखाना दलात भरती झाले. ही बातमी त्यांनी काही काळ घरच्यांपासून लपवून ठेवली. महिनाभरानंतर त्यांनी पत्राद्वारे आपण देशसेवेसाठी सैन्यात दाखल झाल्याचे कळवले. सुरुवातीचा विरोध नंतर अभिमानात बदलला आणि संपूर्ण कुटुंब त्यांच्या पाठीशी उभे राहिले. दादांचे भाऊ व आमचे चुलते मारूती, एकनाथ, कै. तुकाराम व लक्ष्मण गवळी तसेच बहिणी म्हणजे आमच्या आत्या गं. भा. मैनाबाई पोपट वाघ, सौ. जयवंताबाई सुर्यभान रोकडे, गं. भा. मंदाबाई बाबुराव वाघ असा सर्व दादांचा एकत्रित परिवार. आजही हा परिवार वेगवेगळया कार्यक्रमानिमित्त कौटूंबीक स्नेहानिमित्त एकत्र येत असतो. दादांचेही कायम स्वप्न होते काम वेगळे असले तरी परिवार एक असला पाहिजे. ती ईच्छा आजही सर्व कुटूंब जोपसतात.



भारतीय सैन्यातील त्यांचा प्रवास हा केवळ नोकरीचा नव्हता, तर तो राष्ट्रभक्तीच्या व्रताचा होता. त्यांनी जवळपास सोळा वर्षे देशाची निष्ठेने सेवा केली. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांनी शौर्याने सहभाग घेतला. हे युद्ध भारताच्या इतिहासातील सुवर्ण अध्याय ठरले. या युद्धातून बांगलादेश स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आले आणि त्या विजयात आमच्या दादांसारख्या हजारो सैनिकांचे अमूल्य योगदान होते.

युद्धाच्या रणांगणात दादांच्या पायाला गोळी लागली होती. त्यांनी जखमी अवस्थेतही आपले कर्तव्य सोडले नाही. त्या काळात मोबाईल किंवा तत्काळ संपर्काची साधने नव्हती. युद्धादरम्यान गावात ते शहीद झाल्याची अफवा पसरली. घरातील प्रत्येक जण दुःखात बुडाला होता. आई-वडिलांचे अश्रू थांबत नव्हते. दिवसेंदिवस प्रतीक्षा वाढत होती. अखेर युद्ध संपल्यानंतर जवळपास महिनाभराने त्यांचे पत्र घरी आले. त्या पत्रात त्यांनी फक्त एवढेच लिहिले होते-मी सुखरूप आहे, काळजी करू नका. त्या काही शब्दांनी संपूर्ण कुटुंबाला नवजीवन मिळाले. आजही त्या क्षणाची आठवण डोळे पाणावल्याशिवाय राहत नाही.



देशसेवेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना पाच पदके मिळाली. पण त्यांनी कधीच त्या सन्मानाचा गर्व केला नाही. त्यांच्यासाठी सर्वात मोठा सन्मान म्हणजे भारतमातेची सेवा करण्याची संधी होती.

१ जानेवारी १९७९ रोजी सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यानंतरही ते स्वस्थ बसले नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागात त्यांनी नोकरी स्वीकारली आणि पुन्हा एकदा समाजसेवेत स्वतःला झोकून दिले. त्यांना वाटायचे की, आयुष्यभर कर्तव्य करत राहणे हाच खरा धर्म आहे.

दादांना देशसेवेचा प्रचंड अभिमान होता. आपल्या कुटुंबातील एखादा तरी युवक सैन्यात जावा, अशी त्यांची मनापासून इच्छा होती. त्यांनी प्रत्येकाला सैन्यात भरती होण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रेरणेमुळे त्यांचे पुतणे हरीभाऊ गवळी यांनी भारतीय सैन्यात प्रवेश करून देशसेवेचा वारसा पुढे नेला. हीच त्यांच्या जीवनकार्याची खरी पावती होती. घरामध्ये दादांचा स्वभाव अत्यंत करारी होता; पण त्याचबरोबर ते तितकेच प्रेमळ, समजूतदार आणि कुटुंबवत्सल होते. त्यांनी आम्हा सर्व भावंडांवर उत्तम संस्कार केले. प्रामाणिकपणा, कष्ट, शिस्त, देशप्रेम आणि एकोप्याचे धडे त्यांनी आम्हाला कृतीतून दिले. त्यांनी कधी मोठमोठे उपदेश केले नाहीत; पण त्यांचे संपूर्ण आयुष्यच आमच्यासाठी एक आदर्श पाठ्यपुस्तक होते.

आमच्या आई राधाबाई यांच्या साथीने त्यांनी एकत्र कुटुंबाची परंपरा जपली. आम्ही सर्व भाऊ आज विविध क्षेत्रांत कार्यरत आहोत. मोठे बंधू सोमनाथ यांनी मुंबई येथे नोकरी करत कुटुंबाचा मान वाढवला. मी, भारत गवळी, भारतीय जनता पक्ष संगमनेर शहर सरचिटणीस व संगमनेर परिट सेवा बहुउद्देशीय संस्था तालुका अध्यक्ष माध्यमातून सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. समाजातील विविध घटकांसाठी काम करताना दादांनी दिलेले संस्कार आणि त्यांचा त्याग नेहमी माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. बंधू चंद्रकांत आणि सूर्यकांत यांनीही स्वतःच्या कष्टाने आपला संसार उभा केला. आमची बहीण जयश्री खैरनार गुजरातमधील बडोदा येथे सुखी संसार करत आहे.



आज आम्ही सर्वजण वेगवेगळ्या ठिकाणी राहत असलो तरी आमच्यातील प्रेम, आपुलकी आणि एकोप्याचा धागा कायम आहे. हा धागा आमच्या दादांनी आयुष्यभर जपला. त्यांनी आम्हाला शिकवले की, संपत्तीपेक्षा माणुसकी मोठी असते आणि नात्यांपेक्षा मोठे धन जगात दुसरे नाही. दादांनी कधी प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही. त्यांनी जे काही केले ते निःस्वार्थ भावनेतून केले. त्यांच्यासाठी देश प्रथम, कुटुंब द्वितीय आणि स्वतःचे सुख शेवटी होते. म्हणूनच आज त्यांच्या आठवणींना उजाळा देताना आमच्या मनात दुःख आहे, पण त्याहून अधिक अभिमान आहे की आम्हाला अशा महान व्यक्तीचे पुत्र म्हणून जगण्याचे भाग्य लाभले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, दहा पुतणे, सात पुतण्या आणि पंचवीस नातवंडांचा मोठा परिवार आहे. प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबद्दल अपार आदर आणि प्रेम आहे. त्यांनी दिलेले संस्कार हीच आमची खरी संपत्ती आहे.

आज दादा शरीराने आमच्यात नाहीत; पण त्यांच्या आठवणी प्रत्येक क्षणी आमच्या सोबत आहेत. घरातील प्रत्येक निर्णयात, प्रत्येक यशात आणि प्रत्येक संकटात त्यांचे मार्गदर्शन आम्हाला जाणवत राहील. त्यांनी दिलेली देशभक्ती, प्रामाणिकपणा, कष्टाची तयारी आणि माणुसकीची शिकवण आमच्या पुढील पिढ्यांनाही प्रेरणा देत राहील. दशक्रिया विधीनिमित्त आम्ही त्यांना विनम्र अभिवादन करतो. त्यांच्या पवित्र स्मृतींना कोटी कोटी प्रणाम.

दादा, तुम्ही आम्हाला सोडून गेलात, पण तुमचे विचार कधीही सोडून जाणार नाहीत. तुमचा त्याग, तुमची देशभक्ती आणि तुमचे संस्कार आमच्या प्रत्येक श्वासात जिवंत राहतील. तुमच्या पवित्र आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली!

**– भारत गवळी**

**सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष, संगमनेर शहर**








स्वर्गवास : बुधवार दि. २२/०७/२०२६

कष्टाने केलीस आयुष्याची सुरुवात | सर्वांवरती ठेविला मायेचा हात ॥
दृष्ट लागली सुखाला | उरली नाही साथ आम्हाला ॥
शांती लाभो तुमच्या आत्म्याला | हिच प्रार्थना परमेश्वराला ॥



**कै. निवृत्ती गणपत गवळी**

**(माजी सैनिक)**

यांना

**भावपूर्ण श्रध्दांजली**

**दशक्रिया विधी**

शुक्रवार दि. ३१/०७/२०२६ रोजी सकाळी ८.०० वा.
ठिकाण : गंगामाई घाट, केशवतीर्थ, प्रवरातिरी, संगमनेर, जि.अहिल्यानगर

**शोकाकुल**

गं.भा.राधा निवृत्ती गवळी (पत्नी)

| | |
|---|---|
| श्री.मारुती गणपत गवळी (भाऊ) | श्री.सोमनाथ निवृत्ती गवळी (मुलगा) |
| श्री.एकनाथ गणपत गवळी (भाऊ) | श्री.भारत निवृत्ती गवळी (मुलगा) |
| कै.तुकाराम गणपत गवळी (भाऊ) | श्री.चंद्रकांत निवृत्ती गवळी (मुलगा) |
| श्री.लक्ष्मण गणपत गवळी (भाऊ) | श्री.सुर्यकांत निवृत्ती गवळी (मुलगा) |
| गं.भा.मैनाबाई पोपट वाघ (बहिण) | सौ.जयश्री संदिप खैरनार (मुलगी) |
| सौ.जयवंताबाई सुर्यभान रोकडे (बहिण) | श्री.संदिप पुंडलिक खैरनार (जावई) |

गं.भा.मंदा बाबुराव देसाई (बहिण)

**समस्त गवळी परिवार व आप्तेष्ट**



प्रवचनसेवा

**ह.भ.प.पोपट महाराज अगलावे**

यांचा प्रवचनाचा कार्यक्रम होईल.




दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25